# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र:मविनिआ/माअअ/83/2018/314 दि.15.11.2018

**प्रति,**
श्री. शेखर नामदेव कदम,
येरवडा कारागृह, मंडल क्र ३,
येरवडा, पुणे - ४११ ००६.

**विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.**

महोदय,

आपला दि. १५.१०.२०१८ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा), यांचे पत्र क्र. मा.अधि.अर्ज-२०१८/सीआर-०४/एडिएम-२/४५७२ दि. ०२ नोव्हेंबर, २०१८ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३) अन्वये आयोगाच्या कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. सदर अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. १२.११.२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर अर्जातील मुद्दा क्र. १ बाबतची माहिती खालीलप्रमाणे नमूद केलेली आहे.

| No. | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ठरवून दिलेल्या कृती मानके (SOP) ची संपूर्ण माहिती. | महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने यासंदर्भात "मविनिआ (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१४ तयार केलेले आहे आणि मविनिआ (वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके विद्युत पुरवठा सुरू करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) (पहिली सुधारणा) विनियम, २०१७" तयार केलेला आहे.<br>सदर विनियम आयोगाच्या www.merc.gov.in OR www.mercindia.org.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेला आहे. |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in

जर आपणांस सदर विनियमाची छायांकित प्रती हव्या असल्यास, माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार पुढीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

| मागणी केलेली माहितीची छायांकित प्रतीची एकूण पृष्ठे | प्रती पृष्ठ शुल्क रु. | एकूण माहिती शुल्क रु. | टपाल खर्च रु. (माहिती अर्जदार स्वत: घेऊन जाणार असल्यास टपाल खर्च आवश्यक नाही.) | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| २३ | २ | ४६/- | अंदाजे रु. १०० /- | १४६/- |
| | | | एकूण रु. | १४६/- |

वरीलप्रमाणे आकारलेले शुल्क आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई या नावाने धनाकर्ष अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा आपल्या प्रतिनिधीद्वारे रोख रक्कम जमा करुन शुल्क भरल्याची पावती/ चलन पुरावा सत्य प्रत समक्ष सादर करुन आपणांस हव्या असलेल्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील.

आयोगाच्या कार्यालयातील प्रथम अपीलीय अधिकारी श्री. अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई हे आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 चे कलम १९ (१) अन्वये सदर पत्र प्राप्त झाल्यापासून 30 दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

प्रत रवाना:-

व्यवस्थापक (कोजन) तथा जन माहिती अधिकारी,
महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा),
महाराष्ट्र शासन, त्रिदलनगर समोर,
येरवडा, पुणे - ४११००६.